**नियमित दिवाणी दावा क्र.१५४/२०१२ मधील नि.१३५ खालील आदेश**
**पारुबाई दत्तू माने मयत वारस वगैरे वि. शेवंताबाई महादेव माने वगैरे**
**CNR NO.MHST050002552012**

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे –**

वादीने प्रस्तुतचा दावा वाटपाकरीता दाखल केला होता. ती वाटपाची मागणी अनावधानाने केली असलेमुळे पुन्हा दावा मिळकती या वादींचे मालकीच्या आहेत असा जाहीर ठराव मागितला आहे. मूळ दाव्यात दावा कलम १(अ)(१) ही गट नं.६४५ ची मिळकत क्षेत्र ८ आर जयसिंग सावळा माने यांना घर बांधणेसाठी विक्री केली व दावा कलम १(अ)(२) म्हणजे गट नं.६५१ क्षेत्र ८६ आर यातील ३ ।।। पै.चा हिस्सा नारायण बाबुराव देवकर व किसन सावळा माने यांना हस्तांतर केलेचे कथन केलेले आहे. नारायण देवकर व किसन माने यांनी कृष्णा साखर कारखाना यांना २ पै चा हिस्सा विक्री केलेला आहे. सदरची बाब दावा चालू झालेनंतर सदरचा हस्तदोष वादीचे लक्षात आलेला नव्हता. वर नमूद खरेदीदार यांना वाटपाचा दावा समजून प्रतिवादी म्हणून सामील केलेले आहे. त्या अनुषंगिक वादीस दावा दुरुस्त करणे भाग पडले आहे. सदर दुरुस्ती फॉर्मल स्वरुपाची असून सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही बदल होत नाही. म्हणून वादीने अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांनी त्यांचे म्हणणे मुदतीत दाखल केले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द विना म्हणणे आदेश पारीत करण्यात आला.

४. अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. वादीचा युक्तीवाद ऐकला.

५. सदरचा दावा वाटप व जाहीर ठरावाकरीता दाखल केलेला आहे. अंतिम युक्तीवादाच्या वेळी असे लक्षात आले की, गट नं.६४५ ही मिळकत विक्री केलेली आहे. परंतु त्याबाबत हक्कज्ञापनेची दाद मागण्यात आलेली आहे. गट नं.६५१ याचे क्षेत्र ०.८६ आर इतके आहे व दाव्यामध्ये त्याचे संपूर्ण क्षेत्र नमूद करण्यात आले आहे. परंतु सदर गटामध्ये इतर सह हिस्सेदार आहेत. त्यांचे क्षेत्र कमी करुन दावा कलम १अ मध्ये हिस्सा या रकान्यात क्षेत्र नमूद करणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले नाही. त्यामुळे ती दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. तशी दुरुस्ती न झालेस यदाकदाचित दावा मंजूर झालेस प्रत्यक्ष वाटपाच्या वेळेस हुकूमनाम्याची अंमलबजावणी होणे अशक्य आहे. त्यामुळे दावा गुणदोषावर निकाली होणेकरीता सदरची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. सदरचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल. नियोजित दुरुस्ती ही दाव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीताही आवश्यक आहे. वादीने मागितलेली सदरची दुरुस्ती ही आवश्यक असल्यामुळे सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी १४ दिवसांच्या आत दावा दुरुस्त करावा व दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

JYOTI JAGNNATH MANE
Digitally signed by JYOTI JAGNNATH MANE
Date: 2026.03.17 17:16:57 +0530

ठिकाण – कराड (जे.जे.माने)
दिनांक – १७/०३/२०२६ ४ थे सह दिवाणी न्यायाधिश व.स्तर, कराड